# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१६
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २२१ ते २३२ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव —**

महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कुस्तीगीरपट्टु श्री.विजय नथू चौधरी यांनी सलग तिसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी' किताब प्राप्त केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** :

(क) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(२)** | **वित्त व नियोजन मंत्री** | : | (क) | विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ख) | लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र. १.२८ मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन २०१५-२०१६ या वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ग) | भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे (१) विनियोजन लेखा अहवाल (२) वित्तीय लेखा खंड एक व खंड दोन अहवाल (इंग्रजी प्रती) सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (घ) | महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| **(३)** | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | (क) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचे अनुक्रमे बावन्नावा, त्रेपन्नावा, चौपन्नावा, पंचावन्नावा, छप्पन्नावा, सत्तावन्नावा व अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ख) | कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

| | | |
|---|---|---|
| (४) **गृहनिर्माण मंत्री** | : | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील. |
| (५) **परिवहन मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (६) **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (७) **पर्यटन मंत्री** | : | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा अडोतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (८) **कामगार मंत्री** | : | दि खोका मेकींग अँण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**चार : लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे** -

| | | |
|---|---|---|
| **मुख्यमंत्री** | : | "नवी मुंबई, खारघर येथील ओवे गावात बांगलादेशी घुसखोरांना पकडण्यासाठी गेलेल्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकावर हल्ला" या विषयावरील सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील. |

**पाच : पंचायती राज समितीचा सहावा व सातवा अहवाल सादर करणे.**

**सहा : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर विधानसभा सदस्यांची नामनियुक्ती करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचा प्रस्ताव -**

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ च्या कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या परिनियमातील खंड ६(१)(जे) अन्वये उपरोक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर (१) श्री.बाळासाहेब सानप, वि.स.स. व (२) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांची नामनियुक्ती करण्यात यावी."

**सात : समिती प्रमुख तथा महिला व बालविकास राज्यमंत्री यांचा म.वि.स. नियम १८३(१) अन्वये प्रस्ताव :-**

"**पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे**" याबाबत परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी गठीत केलेल्या **महिला संयुक्त तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत वाढवून देण्यात यावी.**

**आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**नऊ : मुखमंत्री यांचे म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव** :-

(अ) "छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई" याचा नामविस्तार "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई" असा करण्यात यावा, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याव्दारे केंद्र शासनास करीत आहे.

(ब) "छत्रपती शिवाजी टर्मिनस" या रेल्वेस्थानकाचा नामाविस्तार "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस" असा करण्यात यावा, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याव्दारे केंद्र शासनास करीत आहे.

(क) "एल्फीन्स्टन रोड" या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून "प्रभादेवी" असे करण्यात यावे, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याव्दारे केंद्र शासनास करीत आहे.

**दहा : औचित्याचे मुद्दे.**

**अकरा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) **सर्वश्री. बबनराव शिंदे, गणपतराव देशमुख, दिलीप सोपल, भारत भालके, अनिल बाबर, सुरेश खाडे,शिवाजीराव नाईक, जयकुमार गोरे, धनंजय गाडगीळ, विलासराव जगताप, डॉ.पतंगराव कदम, श्रीमती सुमन आर. आर. पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्हा हा रब्बी पिकांचा जिल्हा असून परतीच्या पावसावर अवलंबून असणे, या वर्षी सोलापूर जिल्ह्यात परतीचा अजिबात पाऊस पडला नसल्याने ओढे, नाले, पाझर तलाव, विंधन विहिरी कोरडे पडलेले असणे, शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यानंतर पाऊस न पडल्यामुळे करपून गेलेली ज्वारी व इतर पिके, गेल्या वर्षीही जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये ५० पैसे कमी पैसेवारी शासनाने जाहीर केली असणे, गेल्या दोन वर्षाच्या सततच्या कमी पावसामुळे रब्बी पिके हातची गेल्यामुळे डिसेंबर महिन्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई व जनावरांच्या चाऱ्याचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण होणे, याबाबत शासनाने आतापासूनच दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्याची नितांत आवश्यकता, त्याचबरोबर उजनीचे पाणी माढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ, दक्षिण सोलापूर तालुक्यांना, कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यास, टेंभू, म्हैसाळ प्रकल्पाचे पाणी सांगोले, मंगळवेढा, माळशिरस तालुक्याला देणे व सिना, भिमा, माण, कोरडा आदि नद्यांवरील बंधाऱ्यास नवीन दरवाजे बसवुन पाणी अडवणे व उपसा सिंचन योजनेच्या वीज बिलात व पाण्याच्या दरात सवलत देण्याची कार्यवाही करण्याची गरज तसेच गेल्या वर्षीचे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी दुष्काळी निधी वा विम्याची रक्कम तातडीने देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भ विकास मंडळाच्या अहवालानुसार मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भात रस्त्यांच्या प्रचंड अनुशेष असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सध्या २००१-२०२१ या रस्ते विकास आराखड्याचे काम सुरु असताना केंद्राच्या रोड काँग्रेसच्या मार्गदर्शक तत्वानुसार आराखड्यातील लांबीचे उद्दीष्ट प्रत्येक जिल्ह्याच्या क्षेत्रफळाप्रमाणे सारखे असावयास पाहिजे असणे, विदर्भ विकास मंडळाने जाहीर केलेल्या

आकडेवारीनुसार उर्वरीत महाराष्ट्र व मराठवाडा मिळून भौगोलीक क्षेत्रफळ २ लाख ९ हजार चौरस किलोमीटर व रस्त्याचे उद्दीष्ट २ लाख ४२ किलोमीटरचे म्हणजेच प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रफळात रस्त्याची लांबी १.१५ कि. मी. असणे, याउलट विदर्भाचे भौगोलीक क्षेत्रफळ ९७ हजार ४०४ चौ. कि. मी. असताना रस्त्याचे उद्दीष्ट ९४ हजार २४१ कि. मी. चे म्हणजेच प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रफळात ०.९६८ कि. मी. चे असणे, प्रति चौरस कि. मी. १.१५ या उद्दीष्टाला पोहचवण्यासाठी विदर्भासाठी अधिकचे १८ हजार ४५५ कि.मी. रस्त्यांची आवश्यकता असणे, सध्याच्या उद्दीष्टाच्या तुलनेत उर्वरीत महाराष्ट्रात ७८ टक्के, मराठवाड्यात ९१ टक्के तर विदर्भात ७० टक्के रस्ते निर्मीती झालेली असणे, यानुसार विदर्भाचा सुमारे १३ हजार ६५४ कि. मी. रस्त्याच्या अनुशेष असणे, विदर्भात डांबरी रस्त्याने न जोडलेल्या खेड्यांची संख्याही उर्वरीत प्रदेशाच्या तुलनेत अधिक असणे, विदर्भातील सुमारे २ हजार गावाना डांबरी रस्त्याने जोडले गेलेले नसणे, यामुळे विदर्भाच्या सर्वांगिन विकासास खीळ बसलेली असणे, सिंचनापाठोपाठ विदर्भातील रस्त्यांच्या अनुशेषही कायम असून याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची भुमिका."

(३) **सर्वश्री शंभूराज देसाई, सत्यजित पाटील, चंद्रदिप नरके, अनिल बाबर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ग्रामीण भागात, डोंगरी भागात जलस्वराज्य तसेच शासनाच्या पाणी पुरवठा विभागाच्या तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नळपाणी पुरवठा योजनांची करण्यात आलेली कामे, या योजना पूर्ण होऊन अनेक वर्षाचा लोटलेला कालावधी, सध्या ग्रामीण भागातील अस्तित्वात असणाऱ्या सर्व योजना या कालबाह्य तसेच जीर्ण होणे, त्यातच केंद्र शासनाने राष्ट्रीय पेयजल योजनांच्या माध्यमातून नळपाणी पुरवठा योजनांना निधी देणे बंद करणे, त्यामुळे पाटण तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजनांची मोठ्या प्रमाणात दूरवस्था होऊन ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी अनेक अडचणींचा करावा लागत असलेला सामना, शासनाने पाणी पुरवठा योजनांच्या कामांना अनेक निकष लावल्याने लहान लहान गावांच्या योजनांचा समावेश न होणे, त्यातच या योजनाकरीता केवळ ५५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, त्यामुळे ग्रामीण भागातील जीर्ण व नादुरुस्त योजनांची कामे तसेच नव्याने करावयाची कामे तसेच नव्याने करावयाच्या योजनांची कामे रखडणे, सदरच्या योजना तातडीने करण्याची नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **सर्वश्री.प्रताप सरनाईक, सुनिल शिंदे, मंगेश कुडाळकर, सुभाष भोईर, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, किसन कथोरे, राणाजगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून शहरातील ४०-५० वर्षांपूर्वीच्या धोकादायक तसेच अनधिकृत इमारती व चाळींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या पुर्नवसनाचा गंभीर बनलेला प्रश्न, त्यातच गृहनिर्मितीचे धोरण योग्य प्रकारे शहरात न राबविल्यामुळे अनधिकृत बांधकामांचा झालेला सुळसुळाट, शासनाने जाहीर केलेल्या समुह विकास योजनेमुळे धोकादायक व अनधिकृत इमारती व चाळींमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना मिळालेला दिलासा, परंतु मिरा-भाईंदर शहरातील अशा इमारती व चाळींकरीता शासनाने कोणतीही योजना जाहीर न केल्यामुळे लाखो नागरिकांचा जीव धोक्यात असणे, ठाणे शहराच्या धर्तीवर मिरा-भाईंदर महापालिकेसह एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये समुह विकास योजना राबविण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शासनामार्फत कृषीसेवक पदाकरीता दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी घेण्यात आलेली लेखी परीक्षा, सदर परीक्षेचा दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहीर झालेला निकाल, या निकालाबाबत बहूतांश उमेदवारांमध्ये निर्माण झालेला संशय, प्रश्न पत्रिकेतील बरेचसे प्रश्न शंकास्पद असणे, उमेदवारांनी या परीक्षा प्रक्रियेमध्ये पेपर फूटीबरोबरच बऱ्याचशा त्रुटी निदर्शनास येणे, यामध्ये एकाच उमेदवारांचा औरंगाबाद व ठाणे या दोन्ही ठिकाणी झालेली निवड, काही मोजक्याच उमेदवारांना १७९ ते १८६ दरम्यान प्राप्त झालेले गुण, वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची निवड यादीत झालेला समावेश, माजी सैनिकांच्या आरक्षणातून केवळ २४ वर्षीय एक मुलगा आणि २३ वर्षीय एका मुलीची झालेली निवड, एकूण ७३० जागांपैकी फक्त १०७ जागा रिक्त ठेवण्यात येणे, सदरील भरती प्रक्रीया ही पारदर्शक न होता त्यामध्ये झालेला भ्रष्टाचार असल्यामुळे दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**बारा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० – महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०१६.

(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ – महाराष्ट्र विनियोजन (द्वितीय अधिक खर्च) विधेयक, २०१६.

(३) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ – महाराष्ट्र विनियोजन (तृतीय अधिक खर्च) विधेयक, २०१६.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ – महाराष्ट्र निरसन (द्वितीय) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५९ – महाराष्ट्र निरसन (द्वितीय) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**तेरा : श्री. सुनिल प्रभु, डॉ. अनिल बोंडे, श्री. सदा सरवणकर, डॉ. आशिष देशमुख, श्री. सुनिल शिंदे, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. समीर मेघे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. राज पुरोहित, सुरेश धानोरकर, अतुल भातखळकर, रमेश लटके, योगेश सागर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अशोक पाटील, सुधाकर देशमुख, तुकाराम काते, विकास कुंभारे, सुनिल राऊत, राजेंद्र पाटणी, प्रकाश फातर्पेकर, समीर कुणावार, प्रकाश सुर्वे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय पोतनीस, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुनिल देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. कृष्णा खोपडे, सुधाकर कोहळे, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. अमीत साटम, मल्लिकार्जुन रेड्डी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. सुधीर पारवे, चैनसुख संचेती, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"विदर्भातील जलसंपदाचे अपूर्ण प्रकल्प, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यातील पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून पुरेसा निधी उपलब्ध करणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, कालव्याऐवजी पाईपलाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, पाणी वापर संस्था, उपसा सिंचन संस्था बळकट करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैणगंगा व नळगंगा जोडप्रकल्प आणि कन्हान-वर्धा बोगद्याव्दारे नदीजोड प्रकल्पाचा अभ्यास करुन ते तातडीने कार्यान्वित करणे, नागपुरातील मेट्रो रेल्वे व मिहान प्रकल्पाच्या कामातील प्रगती, विदर्भातील नगरपालिकांना हगणदारीमुक्त करणे, भुयारी गटार योजना, भूपृष्ठावरील पेयजल व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते विकास, खुल्या जागा व विकास क्षेत्रामधील जागा संरक्षित करणे, उद्यान निर्मिती व नदी परिसर यांचा विकास करुन स्मार्ट शहर करण्याकडे शासनाचा असलेला रोख, पंतप्रधान आवास योजना "ब" व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे, वन पर्यटन उद्यान, जंगल सफारी, वन संशोधन, बांबू व वन उत्पादनामधून रोजगार निर्मिती करण्यात शासनाने अग्रेसर राहणे, मुंबईतील उपकरप्राप्त व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीचे निकष सुलभ व शिथिल करण्याची आवश्यकता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करुन तेथील जमिनीचे भूसंपादन व तेथील सर्व्हे नं. २३९ वरील जमिनीची पुनर्मोजणी करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांकडून होत असलेली मागणी, आरे वसाहतीतील आदिवासी व पात्र झोपडपट्टीधारकांची समस्या व त्यांचे पुनर्वसन, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**(गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**चौदा : सर्वश्री. जयंत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, गणपतराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, प्रा. वीरेंद जगताप, सर्वश्री. भास्कर जाधव, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री अब्दुल सत्तार, राणा जगजितसिंह पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री दिलीप सोपल, अमिन पटेल, बबनराव शिंदे, सुनिल केदार, राहुल मोटे, मो.आरिफ नसीम खान, हसन मुश्रीफ, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. दत्तात्रय भरणे, धनाजी अहिरे, बाळासाहेब पाटील, डी.पी.सावंत, संग्राम जगताप, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, कालीदास कोळंबकर, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वसंतराव चव्हाण, हनुमंत डोळस, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. विजय भांबळे, कुणाल पाटील, वैभव पिचड,**

**काशिराम पावरा, संजय कदम, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"विदर्भ व मराठवाडयातील शेतमालाची अत्यल्प भावात होणारी विक्री,डाळवर्गीय वस्तुंची मोठया प्रमाणात आयात केल्यामुळे तसेच नोटबंदीमुळे शेतकऱ्याच्या सोयाबीन, कापूस, मूग, उडीद व तूर पिकाला मिळणारे अत्यल्प दर, याप्रकरणी शासनाने कोणतीही उपाययोजना न करणे, परिणामी शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक व त्याला शासनाकडून मिळणारे अभय, आरोग्य विभागातील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफच्या अपुऱ्या संख्येमुळे आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कार्यरत डॉक्टरांना दुर्गम व ग्रामीण भागात राहण्याच्या सुविधा नसणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना निधीअभावी बंद पडणे, परिणामी आदिवासी भागातील बाल मृत्यु व मातामृत्युचे वाढते प्रमाण, गेल्या वर्षभरात राज्यात १८ हजार बालकांचा केवळ कुपोषणामुळे मृत्यु झाल्याचे शासनाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणणे, आयुर्वेदिक डॉक्टरांच्या समस्यांकडे होणारे दुर्लक्ष, कुष्ठरोग्यांचे वाढते प्रमाण, तोतया डॉक्टरांचा सुळसुळाट, अवयवदानातील घोटाळे, रुग्णालयांची अस्वच्छता, खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांचे होणारे उल्लंघन, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या निर्मितीसाठी शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास होत असलेला प्रचंड विरोध, शेतकरी जमिनी देण्यासाठी तयार नसताना जिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांनी शेतक-यांना खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करणे, अस्तित्वात असणारा नागपूर-जालना-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई महामार्गाचे चौपदरीकरण केल्यास वाहतूकीची चांगली व्यवस्था निर्माण होऊ शकणे, मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्ती घोटाळयाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या विशेष कृती दलाने दिनांक २९ ऑगस्ट,२०१६ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी न करणे, अपंगांना प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने आदेश देऊनही सामाजिक न्याय विभागाकडून आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य न मिळणे, अनुसूचित जाती तसेच दलित वस्ती सुधारणेसाठी योजना आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निधी खर्च न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**पंधरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, अजित पवार, गणपतराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ पंतगराव कदम, सर्वश्री.बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, ॲड के.सी.पाडवी, सर्वश्री. अब्दुल सत्तार, अबु आजमी, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमीन पटेल, भास्कर जाधव, सुनिल केदार, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. नसिम खान, राणाजगजितसिंह पाटील, दिलीप सोपल, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनराव शिंदे, धनाजी अहिरे, राहुल मोटे, डी.पी. सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालीदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, राजेश टोपे, श्रीमती. दिपीका चव्हाण, सर्वश्री. कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, अवधुत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्रंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यास शासनास आलेले अपयश, डिजिटल युगात ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या प्रकारामुळे सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवर होणारे अत्याचार, रेल्वेतील वाढत्या गुन्हेगारीमुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांवरील वाढते अत्याचार, मुंबईत वास्तव्य करीत असलेल्या परकीय नागरिकांमार्फत मोठ्या प्रमाणात होत असलेली अमली पदार्थांची तस्करी, अवैध दारु, मटका, जुगार यांचे वाढते प्रमाण, पोलीस दलातील १३ हजार पदे रिक्त असल्याने कामाचा वाढता ताण, पोलिसांवर होणारे हल्ले, त्यात मुंबईच्या वाहतूक पोलिसांचा झालेला मृत्यू, कल्याण येथे पोलीस अधिकाऱ्याला पाण्यात बुडवून मारण्याचा झालेला प्रयत्न, परिणामी देशात घडणाऱ्या IPC अंतर्गत दाखल होणाऱ्या दखलपात्र एकूण गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, पोलिसांची निवासस्थाने व विविध ठिकाणच्या पोलीस ठाण्याची झालेली दयनीय अवस्था, मुंबईतील वाढती गुन्हेगारी, लैंगिक छळ व अपहरणाचे वाढते प्रमाण, सागरी व अंतर्गत सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत शासनाची उदासीनता, तीन वर्षानंतरही डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येचा तपास पूर्ण न होणे, तसेच समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्यासंदर्भात ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, अवैध प्रवासी वाहतूक टॅक्सी व रिक्षा चालकांची दादागिरी, ओला-उबेरला लोकांची

असलेली मागणी, वाहन चाचणीसाठी ट्रॅक उभारणीस होणारा विलंब, राज्यातील २३ लाख वाहने फिटनेस प्रमाणपत्राअभावी बंद असणे, दलितांवरील अत्याचारात झालेली वाढ, दुर्बलांवरील हल्ले रोखण्याची गरज असल्याचे मा.राष्ट्रपतींनी केलेले आवाहन, रेल्वे होमगार्डच्या बनावट हजेरीतील मोठा घोटाळा उघडकीस येऊनही कोणतीही कारवाई न होणे, राज्यातील तुरुंगात मर्यादेपेक्षा अधिक ठेवण्यात आलेले कैदी, तुरुंगातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, तुरुंगात निकृष्ट माल पुरविणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यास होणारा विलंब, पलायन केलेले कैदी अद्याप न मिळणे, वाढत्या वाहनांमुळे वाहतुकीची निर्माण झालेली समस्या, परिवहन महामंडळाचा वाढता तोटा, उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदांमुळे शासनाचा बुडत असलेला महसूल, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**सोळा : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१६ - **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५२ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

**(ब) विचारार्थ :**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६ - **ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४२ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ११ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **ॲड.पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १५ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.